8/22/24, 6:05 PM IMG_20240706_090351 - Sunanda Julme.jpg

INDIAN DEMOCRACY & WOMEN'S POLITICAL PARTICIPATION.

# भारतीय लोकशाहीत स्त्रियांचा राजकीय सहभाग

डॉ प्रा सुनंदा बोरकर जुलमे
१५२, नाईक नगर, म फुले सोसायटी, मानेवाडा रिंग रोड,
नागपूर - 440027 मोबा. 8766422457.
ईमेल - sunandaj205@gmail.com

गोषवारा -

भारतात प्रदीर्घकाळ पुरुषप्रधान समाजव्यवस्था असल्याने लोकशाही शासन प्रणाली स्वीकारली तरी पुरुषसत्ताकतेचा प्रभाव कायम आहे. शिक्षण, कुटुंब, समाज, राजकारण, अर्थकारण इत्यादी सर्वच क्षेत्रात पुरुष वर्चस्व आढळून येते. २६ जानेवारी १९५० पासून भारताने सार्वभौम प्रजासत्ताक लोकशाही गणतंत्र स्वीकारले आहे. भारत ही जगातील सर्वात मोठी आणि सशक्त लोकशाही आहे. वसाहतीनंतरच्या स्वतंत्र अस्तित्वाच्या प्रारंभ काळापासून या देशाच्या संविधानाने स्त्री आणि पुरुष दोघांनाही समान राजकीय आणि नागरी हक्क प्रदान केले आहेत. कलम ३२५ आणि ३२६ मध्ये दिलेल्या मतदानाच्या आणि निवडणूक लढवण्याच्या राजकीय अधिकाराव्यतिरिक्त भारतीय राज्यघटनेचा भाग ३, पुरुष आणि महिलांच्या मूलभूत अधिकाराची हमी देतो. तसेच राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये स्त्री आणि पुरुष दोघांनाही समान कामासाठी समान वेतन सुनिश्चित झाले आहे. लिंग, धर्म, जात, वर्ण, वर्ग असा कुठलाही भेदभाव न करता संपूर्ण भारतीयांसाठी समान कायदे केलेले आहेत. तरी अजूनही स्त्रियांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते. राकारणात अजूनही स्त्रिया यायला धजावत नाही. स्त्रियांनी राजकारणात सहभाग घ्यावा, निर्णयप्रक्रियेत सामील व्हावे यासाठी ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्तीद्वारे स्त्रियांना राजकीय आरक्षण देण्यात आले आहे. त्याबाबतचा आढावा या निबंधात घेण्यात आला आहे.

https://drive.google.com/file/d/1FbFpfZ_FtEDmz8pULvjWWE6iwMjceKPQ/view 1/1